# माझ्या जीवनाची जडणघडण



संपादक

डॉ. स्नेहल तावरे

ॐ स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. ११३०

ॐ माझ्या जीवनाची जडणघडण
(आत्मकथन)

ॐ **प्रकाशक आणि मुद्रक :**
श्री. एल. व्ही. तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे - ४११ ०३०.
टेलिफॅक्स : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
ई-मेल : snehaltawre@gmail.com

ॐ © सर्व हक्क सुरक्षित

ॐ **प्रथमावृत्ती :** १६ ऑक्टोबर २०१६
आठवी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

ॐ **मुखपृष्ठ :** राजेंद्र गिरधारी

ॐ **अक्षरजुळणी :** सॉफ्टवर्ल्ड सर्व्हिसेस, पुणे

ॐ **मुद्रणस्थळ :** स्मिता प्रिंटर्स, पुणे

ॐ ISBN 978-93-85709-44-9

ॐ **पृष्ठसंख्या :** २१०

ॐ **मूल्य :** ₹ २५०/-
**$ 5**

'माझ्या जीवनाची जडणघडण'साठी
सहकार्य, स्नेह आणि संस्कृती देणाऱ्या
सर्वांना आदरपूर्वक अर्पण...

२२. डॉ. महालक्ष्मी मोराळे ...... ११६
२३. डॉ. अपर्णा साबणे ...... १२०
२४. डॉ. द. के. गंधारे ...... १२५
२५. डॉ. नवनाथ रासकर ...... १२७
२६. डॉ. बाळासाहेब दास ...... १३३
२७. डॉ. वंदना खेडीकर ...... १३८
२८. डॉ. स्वाती काळभोर ...... १४५
२९. डॉ. बाबूराव हिरडे ...... १५०
३०. डॉ. शीला गाढे ...... १५५
३१. डॉ. राजेंद्र वाटाणे ...... १६१
३२. डॉ. सोमनाथ दडस ...... १६६
३३. डॉ. रवींद्र कडू ...... १७३
३४. डॉ. प्रज्ञा लामतुरे ...... १८०
३५. डॉ. वंदना नढे ...... १८७
३६. चंदला कुलकर्णी ...... १९०
३७. कल्पना कुलकर्णी ...... १९३
३८. डॉ. महादेव वाळुंज ...... १९५
३९. डॉ. राहुल पाटील ...... २०१
४०. डॉ. रामदास रसाळ ...... २०६


## जीवनाच्या जडणघडणीच्या निमित्ताने...

सहकार्य, स्नेह आणि संस्कृती ही मानवी जीवनाच्या जडणघडणीची त्रिसूत्री आहे. या त्रिसूत्रीवरच प्रत्येकाच्या जीवनाची जडणघडण अवलंबून असते. मूळात जीवनाला आकार कधी, कसा आणि केव्हा द्यायचा याचे एकच एक गणित नसते. मनुष्यजन्म ही एक घटना असली, तरी प्रत्येक माणूस हा एका अर्थी अद्वितीयच असतो. मानवजात एक असली तरी प्रत्येकाची क्षमता वेगवेगळी असते. प्रत्येकाची बुद्धिमत्ता, बौद्धिक चातुर्य, आणि बुद्धीची झेप वेगवेगळी असते. आपण सगळे मानव आहोत असे म्हणताना, म्हटले तर एकसारखेपणा असतो आणि तसा विचार केला तर मानवात एकसारखा दुसरा कोणीच नसतो. अगदी जुळ्यांचे उदाहरण नजरेसमोर आले तरी सकृतदर्शनी एकसारखी दिसली तरी त्यांच्यात फरक हा असतोच. याचाच अर्थ मानवी जीवनातील प्रत्येक माणूस हा 'अद्वितीय' असतो. त्याचे जीवन हे इतरांपेक्षा वेगळे असते; जर जीवन हे वेगळे असेल तर त्याची जडणघडणही वेगळी, वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

'जडणघडण' याचा अर्थ उभारणी असा असेल तर मानवी जीवन हे कशाच्या आधारावर उभे राहते असा विचार मनात येतो. 'सहकार्य' असल्याशिवाय शक्य नाही हे तत्क्षणी लक्षात येते. सहकार्य हे कोणाकोणाचे असू शकते तर सर्वप्रथम जन्म देणाऱ्या मातेचे असते. तिच्या सहकार्याशिवाय मानवाचा जन्मच होऊ शकत नाही. जन्मदात्री जन्म देते आणि ती संगोपनही करते. तिच्या काळजाचा तुकडा म्हणजे तिचे अपत्य असते. स्वत:कडे लक्ष न देता तिचे सर्व लक्ष तिच्या त्या अपत्याकडे असते. त्याच्या सुखदुःखात प्रारंभीच्या काळात ती स्वत:ला गुंतवून ठेवते. 'आई'ची भूमिका अतिशय तन्मयतेने ती पार पाडत असते आणि हे सर्व करताना एक अपार आनंद ती अनुभवत असते. म्हणजे जन्मदात्री किंवा पालनपोषण करणाऱ्या स्त्रीचे सहकार्य मानवी जडणघडणीमध्ये मोलाचे ठरते. या पुस्तकातही प्रत्येकाने आईचे ऋण वेगवेगळ्या रूपांत चित्रित केलेले दिसून येते.

जडणघडणीमध्ये दुसरे सहकार्य वडिलांचे असते. जाणत्या वयात वडिलांचा एक जबरदस्त प्रभाव दिसून येतो. अनेकांच्या जीवनात वडील, हे एक 'रोल मॉडेल' म्हणजे 'आदर्श' असतात. वडील बाहेर गेल्यावर त्यांच्या बुटात पाय घालून गंमतीने चालणारी मुले, वडिलांचा शर्ट नाहीतर स्वेटर पायघोळ होत असला तरी घालून बघणारी मुले, हे सर्व वडिलांवरील अतीव प्रेमापोटीच करीत असतात. आईवडिलांच्या सहकार्याशिवाय घरातील अनेक नातेवाईक माणसाला घडवित असतात. या नात्यात वडीलधारी, समवयस्क तर कधी लहानही असतात. या सर्वांच्या सहकार्यातून माणसाच्या जीवनाची जडणघडण होत असे. मानवी जीवनाला आकार देण्याचे मोठे कार्य ही सर्व मंडळी करीत असतात.

तुमच्यात ही लपला आहे
आव्हान करा त्या सूर्याला
मग उगवेल तो तुमच्या आयुष्यात
नवीन क्षितिज होऊन
मग उगवेल नवी सकाळ
उत्साह आणि ध्येयाने भरून.''

ക്ക



# माझ्या जीवनाची जडणघडण

– डॉ. वंदना नढे

'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी' ह्या उक्तीप्रमाणे मी आज माझी कहाणी सांगणार आहे.

मी मध्यमवर्गीय कुटुंबात वाढले. माझा बाबा-आई चौथीपर्यंत शिकलेले. परंतु त्यांना मुलांनी खूप शिकावे असे वाटायचे. जेमतेम कमाई असलेल्याने (पगारात) आम्ही गिरणी कामगारांच्या मुलींच्या शाळेत दहावीपर्यंत शिकलो. त्या शाळेत गरीब, कामगारांच्या मुली येत. त्यांच्याकडे शिक्षणाचा विचार गांभीर्याने घेतला जात नसे.

उदा. दहावीच्या प्रिलीम परीक्षेनंतर बोर्डपरीक्षेचा अभ्यास करण्यासाठी सुट्टी असते. त्या सुट्टीत आम्ही मैत्रिणींनी एकमेकांच्या घरी जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे रोज 'एक दिवस एक घर' असे आम्ही मैत्रिणी एकेकीच्या घरी जात होतो. दोन-तीन दिवस हा प्रकार चालला आणि एक दिवस कसे कोण जाणे आमच्या वर्गशिक्षिका बाईंना हा प्रकार कळला. त्यांनी आम्हा सर्व विद्यार्थिनींना नोट्स् देते म्हणून शाळेत बोलावले. आम्हीपण सर्वजणी नोट्स मिळणार या आनंदात शाळेत जमलो. तेव्हा बाईंनी आमचे चांगले कान ओढले. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. व शेवटी म्हणाल्या, ''तुम्ही जर अशाच फिरत राहिल्यात तर तुम्ही पास नाही होणार.'' बाई बोलून गेल्या ते शब्द आमच्या मनाला चांगले बोचले. आम्ही सर्व जणींनी ठरविले की अभ्यास करून बाईंना पास होऊन दाखवायचे. आम्ही पास झालो. पुढे एसएनडीटी कॉलेजमध्ये मला 'होम सायन्स' करायचे होते. नेमके त्याच वर्षी विद्यार्थिनींचे कमी अॅडमिशन झाले व ती बॅच बंद झाली. बहुधा परमेश्वराच्या मनात काहीतरी दुसरे चांगले असावे.

म्हणून मला आर्ट्सला अॅडमिशन घेतले त्यात आमचे मामा बँकेत होते. त्यांनी मला 'मराठी' विषय घ्यायला लावला. (खरे तर मला इत्यादी अर्थशास्त्र घेऊन बी.ए. करायचे होते )

अशारितीने माझे एम.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण झाले. सहज एकदा माझ्या प्राथमिक शाळेतील शिक्षिकेची माझी भेट झाली. आमच्या बाईंचा हात

फ्रॅक्चर झाला होता. हाताला प्लॅस्टर होते. ते पाहून मी त्यांची चौकशी केली, ''घरी आराम का नाही करत?'' तेव्हा त्या म्हणाल्या, ''तात्पुरती नोकरी करायला कोणी तयार होत नाही. कोणी शिक्षकच मिळत नाही.'' ''तू सध्या काय करतेस.''

मी म्हटले, ''काहीच करत नाही. एम. ए. मराठी प्रथम श्रेणीत झाले आहे. कुठे नोकरी मिळते का बघते आहे.''

लगेचच त्या म्हणाल्या, ''मग तूच का नाहीस माझा वर्ग दोन-तीन महिने सांभाळत!''

मला आश्चर्य वाटले, मी बाईंना म्हटले, ''बाई, मला शिकवण्याचा अनुभव नाही. मला जमणार नाही.''

त्या म्हणाल्या, ''घाई करू नकोस, तू मला उद्या येऊन सांग.''

घरी आल्यानंतर कुणास ठाऊक माझ्या मनात असा विचार येऊ लागला की, 'ज्या शाळेत आपण शिकलो, त्या शाळेत मला शिक्षिका होण्याची संधी मिळते आहे. का नाही मला जमणार? प्रयत्न करू या.' दुसऱ्या दिवशी शाळेत जाऊन बाईना 'होकार' दिला.

त्यानंतर माझे इन्स्पेक्टर होण्याची जी इच्छा होती ती बदलली व मला 'शिक्षक' व्हावे असे वाटू लागले.

मी बी.एड. झाले व मला मुंबईत ज्युनिअर कॉलेजमध्ये नोकरी मिळाली. पण घरी नोकरीविषयी मत वेगळी होती. आमचे कुटुंब व्यवसाय करणारे घरंदाज, खानदानी विचारांच्या मुलींनी नोकरी करावी हा विचारच त्यांना मान्य नव्हता, ''मुलींच्या कमाईवर काय जगायचे.'' अशा विचित्र वातावरणात मी नोकरी करीत होते.

मला त्यांना पटवून द्यावे लागले की, आजच्या ह्या परिस्थितीत नोकरी किती महत्त्वाची आहे. शिक्षक होऊन मी ज्ञान देण्याचे चांगले काम करते आहे.

नोकरी लागल्यानंतर सहा महिन्यांनी मी कुटुंबातील वरिष्ठांची मने वळवू शकले.

आज माझे पालक अभिमानाने सांगतात की, ''हा आमची मुलगी.......''

तेव्हापासून आजतागायत अनेक अडचणी मला आल्या. मी शहर संस्कृतीत वाढलेली होते. त्या विरुद्ध मी ग्रामीण संस्कृतीत लग्न होऊन आले, नोकरी करण्याचा विचार मनात होता, नोकरीच्या ठिकाणीही मी एकटी स्त्री होते, त्यामुळे बरोबरच्या सहकार्यांना मी त्यांच्या पोटावर पाय देते की काय?



असा समज, त्यात बायका नोकरी करत म्हणजे त्यांना घरी काम करायला नको म्हणून, गंध पावडर या खर्चासाठी,

''जिंदगी अगर मनकी हो जाए तो अच्छा'
अगर ना हो जाए तो भी अच्छा.''

ह्या उद्‌गाराप्रमाणे मी जीवनाकडे एका सकारात्मक दृष्टीने पाहिले. येणाऱ्या वाईट प्रसंगातून मला काही तरी शिकवण मिळणार आहे. या विचाराने मी पुढे जात राहिले. जीवन घडवत राहिले. आज मी एका महाविद्यालयात मराठीची प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहे. दरवर्षी नवीन विद्यार्थि- विद्यार्थिनी (ग्रामीण भागातील) भेटतात, येतात. त्यांना शिकवत त्यांच्याकडून नवीन शिकत मी आनंदाने वाटचाल करीत आहे.

❀❀